**रेग्यु. दिवाणी मुकदमा नं.३३८/१३ मधील नि.५४आणि ५६ खालील आदेश**

१. या दाव्यातील वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींचे विरुध्द दाखल करुन दावा मिळकत संबंधाने जाहीर ठराव, वाटप व अन्य बाबी मंजुर होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. परंतु हा दावा दाखल झालेनंतर या दाव्याचे काम चालु असताना यातील वादी श्री. भिमराव उर्फ भिवराव नारायणराव शिंदे यांचे दि. २५/३/२०१८ रोजी मुरुम, ता. बारामती जि. पुणे येथे निधन झाले आहे. तथापि दावा प्रलंबीत असताना वादी हे मयत झालेने त्यांचे वारस अतिशय दु:खात असलेने त्यांना मुदतीत वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज देता आला नाही. वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस ३ दिवसांचा विलंब झालेला आहे. त्यामुळे सदर वादींचे वारसांना विलंब माफी देणेत येवुन वादीचे अबेटमेंट रद्द करुन वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. मयत वादीचे कायदेशीर वारसांनी/अर्जदार यांनी मुळ वादी यांचे नावापुढे मयत वारस असे लिहुन त्यांचे कायदेशीर वारस म्हणुन १अ. श्री.महेश भिवराव शिंदे वय –४५ वर्षे, १ब. श्रीमती पुष्पलता भिवराव शिंदे वय–६६ वर्षे, १क. सौ.अनुपमा संदीप निकम वय–४३ वर्षे, १ड. अनुराधा भिवराव शिंदे वय–४० वर्षे, सर्वांचा धंदा–शेती, नंबर.१अ, १ब व १ड रा. मुरुम, ता. बारामती, जि. पुणे, नंबर १क–रा.बिल्डींग नं.५ सदनिका नं.१३०२, ॲस्पायर ॲमेनोरा टाउनशिप, हडपसर पुणे यांना रेकॉर्डवर घेणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे ऑर्डर २२ रुल ३ आणि ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन घेणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दुरुस्ती न्यायाचे दृष्टीने आवश्यक असुन त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणुन अर्जदार यांनी दावा दुरुस्तीसाठी सदरचा अर्ज दाखल करुन दुरुस्ती करुन वारस म्हणुन रेकॉर्डवर घेणेकरीता विनंती केली आहे.

३. प्रतिवादी हे या दाव्याचे कामी दाखल झालेले आहेत. सदर अर्जावर त्यांचे म्हणणे मागितले आहे. परंतु त्यांनी सदर अर्जावर म्हणणे वेळेत दाखल केले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द सदर अर्ज ‘‘म्हणणे नाही’’ असा आदेश पारीत करुन विना म्हणणे पुढे चालविणेत येत आहे.

४. अर्जदार यांचा अर्ज पडताळला. अर्जदार/वारस यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारने मुळ वादी यांचे मृत्युप्रमाणपत्र दि.२७/६/२०१८ रोजी दाखल केलेले आहे.

५. वादीचा दावा संपुर्ण वाचला असता प्रस्तुत दाव्याचे काम चालु असताना मुळ वादी दि. २५/३/२०१८ रोजी मुरुम, ता. बारामती, जि. पुणे येथे मयत झाले आहेत. त्यामुळे सदरील अर्जदार हे वारस असलेमुळे व दावा मिळकती संबंधाने त्यांचेही हक्क कायम राहात असलेमुळे त्यांना सामील करुन घेणेबाबत विनंती केली आहे. तसेच वादींचे वारसांना त्यांचेविरुध्द झालेला अबेटमेंट सेट असाईड करुन तीन दिवसांचा झालेला विलंब माफ करणेची विनंती केली आहे. त्यामुळे माझे मते दावा मिळकतीच्या स्वरुपामध्ये बदल होणार नाही. मुळ वादी दि.२५/३/२०१८ रोजी मयत झाले आहेत. वादींच्या वारसांनी वादी वारस म्हणुन सामील होणेसाठी सदरचा अर्ज दि. २७/६/२०१८ रोजी न्यायालयात केलेला दिसतो. अर्जदारांनी सदरचा अर्ज मयत भिमराव उर्फ भिवराव नारायण शिंदे हे मयत झाल्यापासुन दि. २७/६/२०१८ रोजी वारस रेकॉर्डवर घेणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. सबब, सदर अर्ज दाखल करण्यास ३ दिवसांचा नाममात्र विलंब झालेला आहे. सदरच्या दाव्यात मुद्दे निघालेले नाहीत. त्यामुळे या वेळेस जर अर्जदारास वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलबं माफ करुन दावा दुरुस्ती करण्याची परवानगी दिली तर प्रतिवादींना त्यात कैफियत देण्याची संधी मिळेल. प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्जदार यांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. यावरुन खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि.५४ वरील वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला उशीर माफीचा अर्ज (without costs) मंजुर करण्यात येतो.
२. मुळ वादी क्र.१चे वारसांना दाव्यात सामील करण्यास परवानगी देणेत येते.
३. वादी क्र. १अ ते १ड यांना समन्स काढण्यात यावे.
२. अर्जदार/वारसांनी १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दावा दुरुस्ती प्रत दाखल करावी.

फलटण
ता. १३/११/२०१८

(अर्चना ह. ठाकुर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण.